| MHLA130002872023 | नि.दि.दावा क्र. ७३/२०२३<br>धनराज<br>वि.<br>उध्दव व इतर |
|---|---|

**निशाणी क्रमांक ५ वरील आदेश**
**आदेश पारीत दिनांक १३/१२/२०२४**

प्रस्तुतचा अर्ज हा वादीने प्रतिवादींविरुध्द प्रस्तुत दाव्याचा निकाल होईपर्यंत दावा मिळकतीवर मालकी हक्क जाहिर होऊन प्रतिवादींनी व त्यांच्या वतीने इतर कोणीही व नातेवाईक यांनी हस्तक्षेप करु नये म्हणुन तुर्तातुर्त ताकीद मिळणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ नुसार दाखल केला आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे आहे की...**

०२. वादींनी प्रस्तुतचा दावा मालकी हक्क जाहिर होऊन निरंतर मनाई हुकूम मिळणेकरीता दाखल केला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे, वादी व प्रतिवादी क्र.२ हे सख्खे भाऊ असून प्रतिवादी क्र.१, ३ ते ६ हे वादीच्या मयत भावांची मुले आहेत. मौजे जवळगा येथील जागा मालमत्ता क्र.२३ ज्याचे क्षेत्र पूर्व-पश्चिम ७० फुट व दक्षिण-उत्तर ७५ फुट असून त्यातील पूर्व-पश्चिम ७० फुट व दक्षिण-उत्तर १५ फुट जागेवर वादी हा गेले दहा वर्षापासून तोंडी वाटणीनुसार मालक व ताबेदार आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी वादीच्या हक्कामध्ये अडथळा केला म्हणून वादीने प्रतिवादी क्र.१ यांना दि.१२.१०.२०२२ रोजी वकीलामार्फत नोटीस पाठविली. प्रतिवादी क्र.१ यांनी दि.२३.११.२०२२ रोजी वादीच्या वकीलांकडे सदर नोटीसचे उत्तर दिले. तसेच दि.२६.०१.२०२३ रोजी प्रतिवादींनी वादीच्या ताब्यास हरकत अडथळा करु नये म्हणून गावातील व्यक्तींसमोर विनंती केली असता प्रतिवादी क्र.१ ऐकण्यास तयार नाही उलट वादीस धक्काबुक्की करुन शिवीगाळ केली व जागेवर परत आलास तर जिवे मारीन अशी धमकी दिली. इतर प्रतिवादींना दावा मिळकतीत हरकत अडथळा करु नये अशी वादीने विंनती केली असता त्यांनीदेखील ऐकले नाही.

त्यामुळे वादीने दाव्याचा निकाल लागेपावेतो प्रतिवादींविरुध्द तुर्तातूर्त मनाई हुकूम दयावा अशी विनंती वादीनी केली आहे.

**<u>प्रतिवादी यांचे थोडक्यात म्हणणे...</u>**

०३ . प्रतिवादी क्र.१ यांनी नि.१८ वर म्हणणे /पुरसीस दाखल करुन त्यांनी दाखल केलेली कैफियत हाच प्रस्तुत अर्जाचे म्हणणे समजण्यात यावे, अशी विनंती केली आहे. तसेच प्रतिवादी क्र. १, ३ ते ६ च्या विरुध्द प्रस्तुत अर्ज एकतर्फा चालविण्यात येतो.

०४. प्रतिवादी क्र.१ यांनी वादीच्या अर्जातील नातेसंबंधातील कथनाव्यतिरीक्त इतर सर्व नाकारलेली आहेत. प्रतिवादी क्र.१ यांच्या कथनानुसार मौजे जवळगा येथील ग्रामपंचायत घर क्र.२३ जमीन गट क्र.४८ मधील दोन्ही मिळकती हया एकत्र कुटूंबाची वडीलोपार्जित मिळकत आहे. परंतु वादी हा प्रतिवादी क्र.१ यांना त्रास देण्याच्या उद्देशाने गट क्र.४८ मधील ४० आर जमीन हाडप करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे सदरचा खोटा व बनावट दावा दाखल केला आहे. तरी अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र.१ यांनी केली आहे.

०५. पुढील बाबी माझे विचारार्थ उपस्थित होत असुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.-

| अ.क्र. | **<u>विचारार्थ बाबी</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १. | वादीच्या बाजूने प्रथम दर्शनी दावा आहे काय ? | **नाही.** |
| २. | दाव्याचा समतोल/कल वादीकडे आहे काय ? | **नाही.** |
| ३. | तुर्तातूर्त मनाई हुकूमाचा आदेश न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | **नाही.** |
| ४. | आदेश काय ? | **वादीचा प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात येतो.** |

## -: का र ण मि मां सा :-

**विचारार्थ बाब क्र. १ ते ३ :-**

०६. वादीच्या वकील श्री.एस.एम.मुचाटे यांनी असा युक्तिवाद केला की, मौजे जवळगा येथील जागा मालमत्ता क्र.२३ ज्याचे क्षेत्र पूर्व-पश्चिम ७० फुट व दक्षिण-उत्तर ७५ फुट असून त्यातील पूर्व-पश्चिम ७० फुट व दक्षिण-उत्तर १५ फुट जागेवर वादी हा गेले दहा वर्षापासून तोंडी वाटणीनुसार मालक व ताबेदार आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी वादीच्या हक्कामध्ये अडथळा केला म्हणून वादीने प्रतिवादी क्र.१ यांना वादीच्या ताब्यास हरकत अडथळा करु नये म्हणून गावातील व्यक्तींसमोर विनंती केली असता प्रतिवादी क्र.१ ऐकण्यास तयार नाही उलट वादीस धक्काबुक्की करुन शिवीगाळ केली व जागेवर परत आलास तर जिवे मारीन अशी धमकी दिली. इतर प्रतिवादींना दावा मिळकतीत हरकत अडथळा करु नये अशी वादीने विंनती केली असता त्यांनीदेखील ऐकले नाही. त्यामुळे वादीने दाव्याचा निकाल लागेपावेतो प्रतिवादींविरुध्द तुर्तातूर्त मनाई हुकूम दयावा अशी विनंती वादीनी केली आहे.

०७. प्रतिवादींचे विद्वान विधीज्ञ श्री. एम.पी.पडोळे यांनी असा युक्तिवाद केला की, मौजे जवटगा येथील ग्रामपंचायत घर क्र.२३, जमीन गट क्र.४८ मधील दोन्ही मिळकती हया एकत्र कुटूंबाची वडीलोपार्जित मिळकत आहे. परंतु वादी हा प्रतिवादी क्र.१ यांना त्रास देण्याच्या उद्देशाने गट क्र.४८ मधील ४० आर जमीन हाडप करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे सदरचा खोटा व बनावट दावा दाखल केला आहे. तरी अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र.१ यांनी केली आहे.

०८. वादीनी प्रस्तुतचा दावा मालकी घोषित होऊन प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाई ताकिद मिळावी याकरीता दाखल केला आहे. वादींनी त्यांच्या कथनाच्या पुष्टयर्थ प्रतिवादी क्र.१ यांना पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत, ग्रामपंचायत घर क्र.२३ चा ८/अ उताऱ्याची प्रमाणित प्रत इत्यादी कागदपत्र दाखल केली आहेत. वादीने वादग्रस्त जागेचा ८/अ उतारा दाखल केला असून त्यावर वादी व प्रतिवादी क्र.२ यांच्यासह प्रतिवादी

क्र.१ चे मयत वडील बाबु, प्रतिवादी क्र.३ व ४ यांचे मयत वडील शिवाजी व बाबासाहेब अप्पाराव केळे यांच्या नावाची नोंद असल्याचे दिसून येते.

०९. वादीनी प्रस्तुतचा दावा अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांच्या आधारे दाखल केला आहे. अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.२ व इतर प्रतिवादींच्या मयत वडीलांच्या नावे असल्याचे दिसून येते. वादीने दावा मिळकतीची १० वर्षापूर्वी तोंडी वाटणी होऊन त्यामध्ये वादीस पूर्व-पश्चिम ७० फुट व दक्षिण-उत्तर १५ फुट असे क्षेत्र हिस्स्यास आले व तेव्हापासून वादी हा दावा मिळकतीचा मालक व ताबेदार आहे. वादीने त्याच्या कथनाच्या पुष्टयर्थ दावा मिळकतीचा ८/अ उताऱ्या व्यतिरीक्त इतर कोणतेही सबळ कागदपत्र अभिलेखावर दाखल केले नाहीत. दावा मिळकतीची वाटणी मागील १० वर्षापूर्वी झाली असे मोघम नमूद केले आहे.

१०. प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकतीच्या अद्याप वाटण्या झाल्या नाहीत असे कथन केले आहे. दावा मिळकत ही सध्या संयुक्तिकरित्या वादी, प्रतिवादी क्र.२ व प्रतिवादी क्र.१, ३ ते ६ यांच्या मयत वडीलांच्या नावे असल्याचे दिसून येते. दावा मिळकतीची वाटणी झाली आहे हे सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर आहे. त्याकरीता वादीने प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर दाखल करणे आवश्यक आहे. परंतु वादीने कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. मिळकत ही एकत्रीत असल्याबाबत गृहितक असून वादीने सदरचे गृहितक खोडून काढण्याकरीता प्रथमदर्शनी त्याची बाजू सिध्द करणे आवश्यक आहे. तसेच वादी प्रतिवादी व इतर प्रतिवादींचे मयत वडील यांची नावे दावा मिळकतीस संयुक्तिकपणे असल्यामुळे व दाव्यामध्ये दोन्ही पक्षकारांनी नातेसंबंध स्वीकारल्यामुळे दावा मिळकतीमध्ये वादी  व प्रतिवादी हे संयुक्त मालक व कब्जेदार आहेत असा निष्कर्ष प्रथमदर्शनी काढता येतो.

११. अभिलेखावर दाखल कागदपत्रांवरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, वादी व प्रतिवादी हे दावा मिळकतीचे वारसा अधारे मालक व कब्जेदार आहेत. तसेच वादी व प्रतिवादी हे दावा मिळकतीचे सहभागीदार आहेत. प्रचलित कायदयाप्रमाणे घर

जागेमध्ये एका सहभागीदारास दुसऱ्या सहभागीदाराविरुध्द मनाईहुकूम मागण्यास प्रतिबंध करण्यात आलेले आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादींविरुध्द मागणी केलेला तुर्तातूर्त मनाईहुकूम वादीच्या हक्कात देणे न्यायोचित ठरणार नाही. वाद मिळकतीवर तुर्तातूर्त मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादींचे अपरिमित नुकसार होणार आहे, पंरतु वादींचा अर्ज नांमजूर झाल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही.

१२. या सर्व कारणामुळे वादीचा अर्ज प्रथम दर्शनी दिसुन येत नाही. म्हणून प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपर्यत वादीने विनंती केल्या प्रमाणे प्रतिवादींच्या विरुध्द वादींच्या हक्कात तुर्तातूर्त ताकीदीचा आदेश पारीत करणे न्यायोचित होणार नाही. सबब, मी विचारार्थ बाब क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवीत आहे.

**<u>विचारार्थ बाब क्र. ४ :-</u>**

१३. वरील कारणमिमांसा लक्षात घेऊन न्यायोचित होईल असा खालील आदेश पारीत करीत आहे.-

**-: आ दे श :-**

| | |
|---|---|
| १. | वादीचा निशाणी क्र.५ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो. |
| २ | अर्जाचा खर्च मुळ दाव्यासोबत |
| | (खुल्या न्यायालयात जाहीर व अधिघोषित) |

**स्वाक्षरीत/-**

| | |
|---|---|
| दिनांक : १३/१२/२०२४<br>रेणापूर | ( के.के.वाघमारे )<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, रेणापूर |